आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ जून २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- टीईटीचा पेपर भिवंडीत फुटल्यानं उद्या होणारी परीक्षा रद्द, परराज्यातल्या तिघांना अटक

- टीईटी पेपरफुटी प्रकरणी मकोका लावण्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा प्रयत्न, निष्पक्ष चौकशीची विरोधकांची मागणी

- गेल्यावर्षीच्या जून शेवटच्या आठवड्याच्या तुलनेत यंदा राज्यातल्या धरणांमध्ये निम्मा पाणीसाठा

- बंडखोर खासदारांच्या मतदारसंघातल्या उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याला सुरुवात

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार

<><><><><><>

टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्यानं उद्या होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षेची आगामी तारीख लवकरच वेबसाइटवर जाहीर केली जाईल असं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं जाहीर केलं आहे. याप्रकरणी मकोका लावण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. तर या प्रकरणाची तत्काळ, निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसनं दिला आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड-कॅप्सूल**

*(ठाणे जिल्ह्यात भिवंडीमधल्या काही व्यक्तींकडे टीईटीच्या प्रश्नपत्रिकेतले काही प्रश्न असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी आज पहाटे धाड टाकून चौकशी केली. या व्यक्तींकडे असलेल्या कागदपत्रांमध्ये आणि उद्या होणाऱ्या परीक्षेतले प्रश्न समान असल्याचं आढळून आलं. राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी याला दुजोरा दिल्यावर भिवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. राजीव शॉ, आकाश कुमार आणि धीरज सिंह अशी आरोपींची नावं आहेत. यातले राजीव*

*आणि आकाश हे बिहारचे तर धीरज सिंह हा हरियाणाचा रहिवासी आहे. त्यांच्या ताब्यातून मोबाईल, रोख रक्कम आणि TET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे चार संच जप्त करण्यात आले आहेत. आरोपी भिवंडीत कोणाच्या संपर्कात होते, या प्रकरणात कोणत्या शैक्षणिक संस्था किंवा स्थानिक एजंटचा सहभाग आहे का, तसेच या संपूर्ण नेटवर्कचा सूत्रधार कोण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी बातमीदारांना दिली.*

**- अशोक दुधे**

*या प्रकरणाच्या तपासासाठी पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे, या पथकात दोन सहाय्यक पोलीस आयुक्त, ९ पोलीस निरीक्षक आणि इतर वीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, असं दुधे यांनी सांगितलं. ही पथकं विविध ठिकाणी रवाना झाले आहेत, तपासात जे निष्पन्न होईल त्यानुसार दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं ते म्हणाले.*

*टीईटी परीक्षेच्या पेपरफुटीची घटना अत्यंत संतापजनक असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचंही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.*

***आरोपींकडून** जप्त केलेल्या प्रश्नपत्रिकेतले प्रश्न टीईटी प्रश्नपत्रिकेतल्या काही प्रश्नांशी जुळत होते, अशी माहिती शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. या प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेतली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.*

***होल्ड बाईट भुसे***

*नीट परीक्षेचा पेपर फुटल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिषदेने खबरदारी घेतली होती, पेपर कसा फुटला हे चौकशीनंतर स्पष्ट होईल ,असं भुसे यांनी सांगितलं.*

***सातत्याने** विविध परीक्षांचे पेपर फुटणं हे सरकारचं अपयश असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होईलही, पण असे प्रकार वारंवार होणं कधी बंद होणार आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारला विद्यार्थ्यांच्या भवितव्याविषयी देणंघेणं नाही अशी टीकाही त्यांनी केली.*

***होल्ड बाईट वडेट्टीवार***

*या परीक्षेसाठी यंदा ४ लाख २८ हजार १२२ परीक्षार्थी बसले होते. परीक्षेची आगामी तारीख लवकरच वेबसाइटवर जाहीर केली जाईल असं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं जाहीर केलं आहे.)*

**<><><><><><>**

राज्यातल्या मोठ्या, मध्यम आणि छोट्या अशा सर्व धरणांमध्ये आज सकाळपर्यंत सरासरी २२ पूर्णांक ७३ शतांश टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे, अशी माहिती राज्य सरकारनं दिली आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ४२ पूर्णांक १६ शतांश टक्के होता.

महसूल विभागनिहाय पाहता, अमरावती विभागात सर्वाधिक ३८ पूर्णांक ११ शतांश टक्के पाणीसाठा असून, त्या खालोखाल नागपूर, कोकण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर विभागाचा क्रमांक लागतो. पुणे विभागात सर्वात कमी १३ पूर्णांक ४६ शतांश टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याचं शासनानं सांगितलं आहे.

**<><><><><><>**

रायगडावर पिण्यासाठी पुरेसं पाणी उपलब्ध व्हावं यासाठीच्या योजनेला मंजुरी देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. रायगडावर आज तिथीप्रमाणे ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा झाला, या सोहळ्याला शिंदे उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. रायगड हा केवळ दगडांनी बांधलेला किल्ला नाही तर तो आपल्या स्वाभिमानाचा कणा आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

मंत्री भरत गोगावले, स्थानिक आयोजक आणि हजारो शिवभगक्त या सोहळ्याला उपस्थित होते.

<><><><><>

बंडखोर खासदारांच्या मतदारसंघातला दौरा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजपासून सुरू केला. निवडून आल्यावर पक्षांतर केलेल्या खासदारांना आणि भाजपलाही जाब विचारा, असं आवाहन ठाकरे यांनी **यवतमाळ** इथल्या सभेत केलं. दरम्यान, तुमचं स्वातंत्र्य कोणाला हिरावू देऊ नका, पुढची निवडणूक होईल तेव्हा आपल्याच पक्षाचा उमेदवार निवडून द्या, असं आवाहनही त्यांनी केलं. वाशिममध्ये झालेल्या सभेत त्यांनी पक्षाशी प्रतारणा करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही, असा इशारा दिला. याच सभेतून उद्धव ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वाशिम मतदारसंघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांच्या उमेदवारीची घोषणा केली. कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे, असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा, असं आवाहन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी केलं आहे. बारामती इथं 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत आयोजित शेतकरी मेळाव्यात ते आज बोलत होते.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या बाजार समित्यांमध्ये कांदा दरात सुधारणा झाली असून कांद्याचा दर सरासरी प्रतिक्विंटल तीन हजार रुपयांपुढे गेला आहे. पूर्व आशियाई देशांकडून वाढलेली मागणी आणि विविध राज्यांतून होत असलेली खरेदी यामुळे लासलगाव, पिंपळगाव बसवंत सारख्या प्रमुख बाजारपेठांसह अन्य बाजार समित्यांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे.

<><><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात अवैध वाळू उपसा प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी मंडळ अधिकारी आणि तलाठ्याला निलंबित केलं आहे. तसंच तहसिलदाराचं निलंबन करण्याचा प्रस्ताव त्यांनी राज्य सरकारला पाठवला आहे. गुरुवारी देसाईगंज तालुक्यातल्या कोंढाळा इथं सिंड्राई रेती घाटावर अवैध रेती उपसा सुरु असताना लोडरखाली दबून एका मजुराचा मृत्यू झाला होता.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरुन मन की बात च्या १३५व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन AIR ॲपवरून ‘मन की बात’ ऐकता येणार आहे.

<><><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर पोलिसांनी ३५ लाख २० हजारांचा प्रतिबंधित गुटखा आणि कंटेनर जप्त केला. या प्रकरणी राजस्थानच्या २२ वर्षीय चालकाला अटक करण्यात आली. राष्ट्रीय महामार्गावर नाकाबंदी करून सुरतहून विजयवाड्याकडे जाणारा कंटेनर जप्त करत पोलिसांनी ही कारवाई केली.

<><><><><><>

लातूर जिल्ह्यातल्या शिरूर अनंतपाळ तालुक्यामधल्या शिवपूर गावात आज महिला आणि ग्रामस्थांनी अवैध दारू विक्री करणाऱ्या ढाब्याची तोडफोड करून आग लावली. अवैध दारू विक्री करणाऱ्या ढाब्याची पोलिसांकडे वारंवार तक्रार करूनही ते दखल घेत नसल्यानं ही तोडफोड केल्याचं आंदोलनकर्त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहील, बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल तर तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल,

असा हवामान खात्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे वाहतील आणि जोरदार पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

<><><><><><>

पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी उद्या राज्यात आयोजित 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत' सहभागी व्हावं, असं आवाहन राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे.

//<><><><><><>//